श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

## संगमेश्वर कॉलेज
## सोलापूर



# प्रतिभासंगम

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर



प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** - धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती** –
प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई
उपप्राचार्य प्रसाद कुंटे
प्रा. एस. डी. गोठे

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई-मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## अंतरंग...

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया ( भारतीय कंपनी सचिव संस्थान ) पुणे शाखा आणि संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) वाणिज्य विभाग यांच्यात कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया पुणे शाखेचे अध्यक्ष संजय पठारे आणि प्राचार्य राजेंद्र देसाई यांनी करारावर स्वाक्षरी करून पुढील वाटचाल स्पष्ट केली. 3

**'परीक्षा पे चर्चा पर्व सहा'** या उपक्रमांतर्गत इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 4 **भारताच्या ७४ व्या** प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन संगमेश्वरच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आले होते. 6

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांना व्यापक संधी - उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर - 7 खेळाडूंनी क्रीडा प्राविण्याबरोबरच शैक्षणिक गुणवत्ताही सांभाळावी - राष्ट्रीय जलतरणपटू कविता चिट्टिअप्पा - 10 मराठी भाषा पंधरवड्या निमित्त संगमेश्वर कॉलेजमध्ये 'शब्दविणा ' भित्तीपत्रकाचे उद्घाटन 13

विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे--- संगमेश्वर कॉलेजमध्ये आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद **-14** जेईई मेनमध्ये संगमेश्वर कॉलेजचे देवांग देशपांडे, प्रवीण याबाजी अव्वल **-16** दैनिक संचार , सोलापूर आवृत्तीतील लेख , परीक्षेला जाता जाता... 17
**SANGMESHWARIANS ON TREK 20**

पालक हे मुलांचे आदर्श असतात त्यामुळे पालकांचे आचरण हे मुलांसाठी अनुकरणीय असते. असे प्रतिपादन ॲकॅडमी फोर क्रिएटिव्ह टीचिंग बंगळूरूचे चेअरमन डॉ. गुरुराज करजगी यांनी केलं. ' पालकत्व एक कला ' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले **24** तरुणांच्या कल्पक संशोधनाला वाय द्वेंटी तून संधी - डॉ. उमेश काकडे **25**

# भारतीय कंपनी सचिव संस्था व संगमेश्वर कॉलेजमध्ये सामंजस्य करार

# करिअर इन कंपनी सेक्रेटरी या विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन







**सोलापूर प्रतिनिधी**

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया ( भारतीय कंपनी सचिव संस्थान ) पुणे शाखा आणि संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) वाणिज्य विभाग यांच्यात कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया पुणे शाखेचे अध्यक्ष संजय पठारे आणि प्राचार्य राजेंद्र देसाई यांनी करारावर स्वाक्षरी करून पुढील वाटचाल स्पष्ट केली. याप्रसंगी करिअर इन कंपनी सेक्रेटरी या विषयावर सोलापुरातील यशस्वितांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी,उपप्राचार्य वंदना पुरोहित, उपप्राचार्य प्रसाद कुंटे,निवृत्त उपप्राचार्य आनंद हुली, बसय्या हणमगाव, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यावेळी उपस्थित होते.


याच कार्यक्रमात करिअर इन कंपनी सेक्रेटरी या विषयावर सीएस पवन चंडक, शिरीष पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यात त्यांनी सांगितलं की,'' विषयनिहाय अभ्यास करत वाणिज्य क्षेत्रातील उत्तम करिअर कंपनी सेक्रेटरी मध्ये आपण करू शकतो, त्यासाठी सातत्यपूर्ण कठोर परिश्रमाची गरज आहे.'' प्रारंभी दीपप्रज्वलन झाले. प्रास्ताविक मल्लिनाथ साखरे यांनी केले. त्यानंतर पुणे शाखेच्या वतीने उपस्थित यांचा सत्कार झाला. सत्कारानंतर फलकाचे अनावरण झाले. सूत्रसंचालन संगीता म्हमाणे यांनी केले बसय्या हणमगाव यांनी सर्वांचे आभार मानले.






# ‘परीक्षा पे चर्चा’ पर्व ६ या उपक्रमांतर्गत आयोजित चित्रकला स्पर्धेस संगमेश्वरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

## जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद




**‘परीक्षा पे चर्चा पर्व सहा’** या उपक्रमांतर्गत इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संगमेश्वर कॉलेजच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला .आझादी का अमृत महोत्सव, बेटी बचाव बेटी पढाव, आत्मनिर्भर भारत, स्वच्छ भारत अभियान अशा एकूण दहा विषयांवर आपली चित्र विद्यार्थ्यांनी रेखाटली. या प्रसंगी जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी भेट दिली. याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र देसाई, माध्यमिक शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी दिलीप स्वामी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.





**‘परीक्षा पे चर्चा पर्व सहा’ या उपक्रमांतर्गत इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी भेट दिली.**

# भारताचा ७४ वा प्रजासत्ताक दिन संगमेश्वरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा



**सोलापूर प्रतिनिधी**

भारतीय भारताचा ७४ वा प्रजासत्ताक दिन संगमेश्वरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा साजरा झाला. सर्वप्रथम ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियन च्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर प्राचार्य राजेंद्र देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. उपस्थितांना प्राचार्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर वर्षभरात विशेष प्राविण्य मिळवलेल्या प्रा. आप्पासाहेब ढोणे,डॉ. सुहास गाडे ,राहुल कऱ्हाडे,प्रा.सौ .डॉ. बगले या मान्यवर शिक्षक,कर्मचारी यांचा प्राचार्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला .

याप्रसंगी उपप्राचार्य वंदना पुरोहित, डी.एम. मेत्री, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीनिवास गोठे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रसाद कुंटे, एनसीसी कॅडेट, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.मेजर चंद्रकांत हिरतोट आणि डॉ.राजकुमार मोहरकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



# संगमेश्वरच्या क्रीडांगणावर भारताच्या ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**भारताच्या ७४ व्या** प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन संगमेश्वरच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आले होते. याचे उद्घाटन संस्थेचे सचिव धर्मराज काडादी यांच्या हस्ते झाले. प्रारंभी सर्व संघांची ओळख सचिवांनी करून घेतली. त्यानंतर नाणेफेकी झाली.सुरुवातीच्या संघामध्ये सामना सुरू झाला . यावेळी संगमेश्वर शिक्षण संकुलाचे प्राध्यापक, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी यशस्वीतेसाठी सर्व विभाग प्रमुख, तसेच जिमखाना विभाग प्रमुख आनंद चव्हाण, विक्रांत विभुते, यांनी परिश्रम घेतले. यामध्ये ज्युनिअर सायन्स, ज्युनिअर आर्ट्स,ज्युनिअर कॉमर्स, शिक्षकेतर कर्मचारी संघ आणि व्यवस्थापन व संगणक शास्त्र संघ या संघात बाद पद्धतीचे नॉक आऊट अर्थात बाद पद्धतीने सामने खेळले गेले. व्यवस्थापन व संगणक शास्त्र संघ विरुद्ध ज्युनिअर आर्ट्स यांच्यात चुरशीचा अंतिम सामना झाला .यात व्यवस्थापन व संगणक शास्त्र संघ विजयी झाला.सामन्याचे धावते वर्णन मराठी विभागप्रमुख सुहास पुजारी, संतोष पवार, हिंदीमधून शरण वांगी ,संतोष खेंडे, राजेंद्रकुमार तोळणुर यांनी केले. विजेत्या संघाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात फिरता चषक देऊन गौरव करण्यात येणार आहे.







# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांना व्यापक संधी

**- उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

## संगमेश्वरचा 69 आणि 70 वा वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ



**सोलापूर, दि. 28 जानेवारी** :आज शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल होत आहेत, पारंपरिक शिक्षण पद्धतीला बदलून कौशल्यावर आधारित नव्या शैक्षणिक संधी शोधल्या जात आहेत. यातून विद्यार्थ्यांचा व्यापक विकास होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यासाठी विशेष प्रयोजन केलेले आहे. या धोरणाकडे सर्वांनी सकारात्मक दृष्टिकोनातून पहावे. विशेषतः विद्यार्थ्यांना यातून व्यापक संधी उपल होतील. असे विचार महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केले.

संगमेश्वर कॉलेजमध्ये 69 आणि 70 व्या क्रीडा पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमास मंचावर श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. ईरेश स्वामी, संस्थेचे सचिव मा. धर्मराज काडादी, मा. सौ. उमा काडादी, सौ. रेणुका देवळाणकर, राशी देवळाणकर, व्यवस्थापन सदस्य मा. शरणराज काडादी, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. उमेश काकडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास गोठे, कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. दिपक पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस मालप आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच श्री. सिद्धेश्वर देवस्थान समितीचे सदस्य मा. आर.एस. पाटील, माजी प्राचार्य. नरेश बदनोरे, डॉ.एन.बी. तेली, डॉ. श्रीकांत येळेगांवकर, आणि डॉ. प्रमोद दर्गोपाटील इत्यांदींची विशेष उपस्थिती होती.

# संगमेश्वरचा 69 आणि 70 वा वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ...



डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सर्वप्रथम श्री. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या मागील 70 वर्षातील कार्याचा गौरव केला. विशेषतः शिक्षणाची चळवळ तळागळापर्यंत पोहचवली याचे कौतुक केले. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून होणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील बदलाची माहिती दिली. येणारा काळ धोरणाच्या अंमलबजावणीचा असून त्यामध्ये क्रांतिकारक बदल होणार आहेत. विशेषतः त्यामधून कौशल्य आधारित शिक्षणावर भर दिला जाणार आहे. भारतातील सर्व विद्यापीठांचे अभ्यासक्रम, श्रेणी पद्धती समानपातळी आणली जाणार आहे. विद्यार्थ्यांना त्यामधून व्यापक शैक्षणिक संधी मिळणार असून यासाठी सर्वांनी प्रयत्न गरजेचे आहे असे विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमाची सुरुवात संगमेश्वर गीताने व कु. वैशाली आगलावे, कु. वैष्णवी व्हनकवडे यांच्या ईशस्तवनाने झाली. पाहुण्यांचा परिचय प्रा. अनिता अलकुंटे यांनी करुन दिला. वरिष्ठ महाविद्यालय अहवाल वाचन प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई यांनी तर संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या अहवालाचे वाचन प्राचार्य डॉ. श्रीनिवास गोठे यांनी केले. शैक्षणिक गुणवत्ता यादीचे वाचन कनिष्ठ विभाग उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे, वरिष्ठ विभाग डॉ. व्ही. एन. मुलीमनी, रात्र महाविद्यालय सौ. आर. एस. बिराजदार यांनी केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस मालप याने मानले. सूत्रसंचालन डॉ. आरती दिवटे, डॉ. पुष्पांजली मेत्री व प्रा.संतोष पवार यांनी केले. याप्रसंगी मोठया संख्येने विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# संगमेश्वरचा 69 आणि 70 वा वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला त्याची क्षणचित्रे










# खेळाडूंनी क्रीडा प्राविण्याबरोबरच शैक्षणिक गुणवत्ताही सांभाळावी

**- राष्ट्रीय जलतरणपटू कविता चिट्टिअप्पा**

## संगमेश्वरचा 69 आणि 70 वा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात




**सोलापूर,दि.28 जानेवारी :** विद्यार्थी जीवनामध्ये खेळाला महत्त्वाचे स्थान असते. त्यामधून शारीरिक व मानसिक विकास घडून येतो. खेळातून विद्यार्थ्यांना ऊर्जा मिळते, त्यांचा आत्मविश्वास वाढतो, शारीरिक विकास होतो. असे असले तरी खेळाडूंनी मानसिक स्वास्थ्य सांभाळणे गरजेचे आहे. कारण यातून त्यांचा बौद्धिक विकास होतो, त्यांची गुणवत्ता वाढते ज्याचा उपयोग जीवनात यशस्वी होण्यासाठी पूरक ठरतो. म्हणून प्रत्येक खेळाडूने क्रीडा प्राविण्याबरोबरच शैक्षणिक गुणवत्ताही सांभाळावी असे विचार राष्ट्रीय जलतरणपटू कविता चिट्टिअप्पा यांनी व्यक्त केले.

संगमेश्वर कॉलेजमध्ये 69 आणि 70 व्या क्रीडा पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास मंचावर श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. ईरेश स्वामी, संस्थेचे सचिव मा. धर्मराज काडादी, मा. सौ. उमा काडादी, प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई , उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास गोठे, कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. दिपक पाटील, जिमखाना प्रमुख प्रा. आनंद चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस मालप आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच डॉ. सी.बी.नाडगौडा, आणि प्रमोद दर्गोपाटील इत्यादींची विशेष उपस्थिती होती.

# संगमेश्वरचा 69 आणि 70 वा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात




या कार्यक्रमाची सुरुवात संगमेश्वर गीताने व कु. वैशाली आगलावे, कु. वैष्णवी व्हनकवडे यांच्या ईशस्तवनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लीना खमीतकर यांनी करुन दिला. जिमखाना अहवाल व वरिष्ठ क्रीडा पारितोषिक यादी वाचन प्रा. आनंद चव्हाण यांनी केले. प्रा. विक्रांत विभूते यांनी कनिष्ठ विभाग तर प्रा. शरण वांगी यांनी संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या क्रीडा पारितोषिक यादीचे वाचन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते खेळाडूंना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडाप्रशिक्षकांचा व यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस मालप याने मानले. सूत्रसंचालन डॉ. आरती दिवटे, डॉ. पुष्पांजली मेत्री व प्रा.संतोष पवार यांनी केले. याप्रसंगी मोठया संख्येने विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## खेळाडूंनी क्रीडा प्राविण्याबरोबरच शैक्षणिक गुणवत्ताही सांभाळावी असे मार्गदर्शन राष्ट्रीय जलतरणपटू कविता चिट्टिअप्पा यांनी संगमेश्वरच्या 69 आणि 70 व्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभात केले. त्या त्या प्रसंगाची क्षणचित्रे...












# मराठी भाषा पंधरवड्या निमित्त संगमेश्वर कॉलेजमध्ये 'शब्दविणा' भित्तीपत्रकाचे उद्घाटन







**सोलापूर दिनांक १६** मराठी भाषा पंधरवड्या निमित्त संगमेश्वर कॉलेजमध्ये 'शब्दविणा' या भितीपत्रकाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई यांच्या हस्ते झाले.याप्रसंगीउपप्राचार्य डी. एम. मेत्री ,मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ.सुहास पुजारी, डॉ.महादेव देशमुख, हिंदी विभाग प्रमुख डॉ. संघप्रकाश दुड्डे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दादासाहेब खांडेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. साखरे, भूगोल विभागप्रमुख डॉ. राजकुमार मोहोरकर , डॉ. मकानदार आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी भित्तीपत्रक तयार करण्यामागचा उद्देश विभागप्रमुखांनी सांगितला. त्यात ते म्हणाले की,'' मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. मातृभाषेतून झालेल्या शिक्षणातूनच आपण साहित्याच्या वाटा निवडत असतो. ती संधी मराठी विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपल होते. कॉलेजच्या वार्षिक अंकात देखील विद्यार्थी विद्यापीठ स्तरावर पुरस्कार मिळवत असतात त्यामागे अशा उपक्रमांचे योगदान असते, म्हणून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात भाषेचे निगडित तसेच लेखन कौशल्यावर आधारित विविध उपक्रमात सहभागी व्हावे. त्यातून व्यक्तिमत्त्वाचा भाषिक कौशल्याचा सर्वांगीण विकास होतो.'' त्यानंतर भित्तीपत्रकाचे उद्घाटन झाले. उद्घाटनानंतर आपल्या मनोगतात प्राचार्यांनी भित्तीपत्रकासारखे उपक्रम भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी उपयुक्त असल्याने विद्यार्थ्यांनी यामध्ये अवश्य सहभागी व्हावे तसेच आपल्या प्रज्ञा या वार्षिक अंकाच्या माध्यमातून देखील आपण सतत लिखाणासाठी तयार राहावे. असे आवाहन त्यांनी केले.

या दालनात कवी केशवसुत, इंदिरा संत यांच्या कविता, चंद्रशेखर गोखले यांच्या चारोळ्या यांचा समावेश आहे.अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांची संकलित माहिती या देण्यात आली आहे.सुलेखन संतोष पवार यांचे आहे. छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सारीपुत्र तुपेरे डॉ.सारीपुत्र तुपेरे यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी मराठी ,हिंदी, इंग्रजी या विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

**या संपूर्ण कार्यक्रमाची युट्युब लिंक**
https://youtu.be/kTw3vUCyHVQ?feature=shared

# विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे--- संगमेश्वर कॉलेजमध्ये आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद






**संचार प्रतिनिधी** • सोलापूर, दि. ६ विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा वापर चांगल्या कामासाठी करून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. इंग्रजीबरोबरच संगणक साक्षर व्हावे, परंतु अहंकाराचा वारा लागू देऊ नये, असा मौलिक सल्ला कर्जत-जामखेडचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा आमदार रोहित पवार यांनी दिला. सोमवारी, संगमेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र व्हिजन फोरम या युवाकेंद्रित 'समृध्द महाराष्ट्राचा आवाज व्हा' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी शिक्षण, समाजकारण, राजकारण, आरोग्य, औद्योगिक विकास, शेती, पर्यावरण, क्रीडा, मानसिक स्वास्थ्य, साखर कारखाना आदी विविध प्रश्नांबद्दल विद्यार्थ्यांची मते जाणून घेत त्यांना मनमोकळी उत्तरे देऊन विद्यार्थ्यांची मने जिंकली. यावेळी त्यांनी सोलापूरची ओळख काय ? या प्रश्नाने संवाद साधण्यास माहिती सांगताना त्यांनी कुठलाही संकोच न करता आपण नववीपर्यंत शिक्षणात कसे कच्चे होतो आणि नंतर मात्र स्वतःहून कशी प्रगती साधली.

सुरुवात करून युवकांना बोलते केले. तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांना हेरून त्याची योग्य उत्तरेही दिली. आपल्या वैयक्तिक जीवनाबद्दलची जिल्हा परिषद सदस्य ते आमदार कसा झालो याबद्दलही त्यांनी दिलखुलासपणे सांगून विद्यार्थ्यांवर प्रश्नांची सरबत्ती करत त्यांच्या मनावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडली.

आपल्याकडे संधी मोठ्या प्रमाणात असली तरी चुकीच्या शिक्षण पध्दतीमुळे देशात ५० टक्के युवक बेरोजगार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना रोजगारपूरक शिक्षण देण्यासाठी राज्यकर्त्यांनी तसे धोरण निर्माण करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. तसेच इंटरनेटचा वापर चांगल्या कामासाठी करा, शेतीला शेवटचा पर्याय म्हणून न बघता तिला प्राथमिकता द्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, इंग्रजीचा वापर करण्याबरोबरच संगणक वापराबाबत साक्षर व्हा, अहंकार येऊ देऊ नका, असे आवाहन करून स्त्री- -पुरुष समानता, कुपोषण, महिला धोरण, शेतकरी आत्महत्या, विनाअनुदानित शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न, नद्याजोड प्रकल्प तसेच तृतीयपंथी आणि दिव्यांगांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

तसेच तुम्ही देशाचे भविष्य असताना राजकर्ते तुमचे मत विचारात घेतात का? असा प्रश्न उपस्थित करून देशातील मूलभूत प्रश्नांवर मतदान करून युवा शक्तीने महाराष्ट्र व्हिजन फोरमच्या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहनही आमदार पवार यांनी केले. प्रारंभी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्यावतीने संस्थेचे संचिव धर्मराज काडादी यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, संचालक महादेव जम्मा, ॲड. शिवशंकर बिराजदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यक्रमानंतर त्यांना शासकीय दिनेश शिंदे, प्रशांत बावर, वैद्यकीय महाविद्यालयातील परिवहनचे माजी सभापती विद्यार्थ्यांच्यावतीने त्यांच्या आनंद मुस्तारे, महाविद्यालयाचे विविध मागण्यांचे निवेदन प्रभारी प्राचार्य राजीव देसाई देण्यात आले. कार्यक्रमाचे. यांच्यासह विद्यार्थी मोठ्या सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी संख्येने उपस्थित होते.



सोलापूर, मंगळवार, ७ फेब्रुवारी २०२३ संमिश्र

# नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे

## 'संगमेश्वर'मध्ये आमदार पवार यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

### एक मे रोजी बक्षीस वितरण

# जेईई मेनमध्ये संगमेश्वर कॉलेजचे देवांग देशपांडे, प्रवीण याबाजी अव्वल






**सोलापूर ( दिनांक ७ )**नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ने JEE मुख्य सत्र एकचा निकाल जाहीर केला आहे. जेईई मेनमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या देवांग नितीन देशपांडे (९६ .७०) प्रवीण अनिल याबाजी (९४.५६ ) पर्सेन्टाइल गुण मिळवून कॉलेजमधून अव्वल ठरले. सोमवारी रात्री उशिरा JEE चा निकाल जाहीर झाला. jeemain.nta.nic.in आणि ntaresults.nic.in या दोन अधिकृत वेबसाइटवर JEE मुख्य निकालाच्या लिंक देण्यातआल्या होत्या . ही परीक्षा २४ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत घेण्यात आली होती. NTA ने शेअर केलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारीच्या सत्र परीक्षेसाठी ९ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती.

यशस्वी विद्यार्थ्यांचा संगमेश्वर कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला.यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई ,उपप्राचार्य प्रसाद कुंटे ,एसआयपी समन्वयक डॉ. गणेश मुडेगावकर,संतोष पवार यांनी अभिनंदन करून पुढच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या



# परीक्षेला जाता जाता...

परीक्षेत चांगले यश मिळवण्यासाठी चांगला अभ्यास करण्याबरोबरच उत्तरप्रत्रिका कशी लिहितो यावर आपल्याला किती गुण मिळणार हे अवलंबून असते. अभ्यास चांगला करूनही व्यवस्थित उत्तरपत्रिका लिहिली नाही तर चांगले गुण मिळू शकत नाहीत. म्हणूनच उत्तरपत्रिका चांगली लिहिण्यासाठी कोणत्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे याविषयी जाणून घेणे आवश्यक ठरते. आपल्या हातात प्रश्नपत्रिका पडल्यानंतर ती शांतपणे वाचली पाहिजे. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व्यवस्थित समजावून घेतले पाहिजे. अनेकदा प्रश्न व्यवस्थित न वाचल्याने त्याची उत्तरे आपण योग्य रीतीने लिहू शकत नाही. तसे झाल्यास आपल्याला चांगले गुण मिळू शकत नाहीत. प्रश्नपत्रिका वाचत असतानाच आपण उत्तरे कोणत्या पद्धतीने लिहिली पाहिजेत याचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे. काही प्रश्नांची उत्तरे दीर्घ स्वरूपात लिहिणे आवश्यक असते; तर काहींची उत्तरे एका वाक्यात एका शब्दात लिहावयाची असतात. भाषा विषयांचे न सोडविताना काळजी घेणे आवश्यक असते.

ज्या प्रश्नांकरिता अधिक गुण आहेत किंवा जे प्रश्न आपण लवकर सोडवू शकतो असेच प्रश्न हातात घेऊन लिहिण्यास सुरुवात केली पाहिजे. तसेच आपल्याला पाचपैकी कोणतेही तीन प्रश्न सोडवण्यास सांगितले गेले असेल तर प्रथम आपल्याला ज्या प्रश्नांची उत्तरे चांगल्या पद्धतीने लिहिता येण्याचा विश्वास असतो, त्याच प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करा. तसेच हुकमी गुण मिळवून देणारे गाळलेल्या जागा भरा, जोड्या लावा यासारखे प्रश्न पटकन सोडवून टाका. दीर्घ स्वरूपाची उत्तरे लिहिताना गाळलेल्या जागा भरा, जोड्या लावा यासारखे हुकमी गुण मिळवून देणारे प्रश्न सोडवण्याचे राहून जाऊ शकते.

सुवाच्य अक्षर :

उत्तर पत्रिका लिहिताना अक्षर सुवाच्य असले पाहिजे. प्रत्येकाचे अक्षर चांगले, वळणदार असते असे नाही. मात्र, आपण उत्तर पत्रिका तपासणाऱ्या व्यक्तीला आपले अक्षर व्यवस्थित वाचता येईल अशा पद्धतीचे असले पाहिजे. त्यात खाडाखोड करू नये. उत्तरपत्रिका स्वच्छ असली पाहिजे. हस्ताक्षर चांगले असेल तर आपल्याबद्दल प्रश्नपत्रिका तपासणाऱ्याचे मत चांगले होते. उत्तरे अचूक लिहिली असलीत पण गिचमिड अक्षरांमुळे उत्तरपत्रिका तपासणाऱ्या व्यक्तीला ती वाचताच आली नाहीत तर तुम्हाला चांगले गुण मिळू शकत नाहीत. म्हणूनच विद्यार्थ्यांनी चांगले अक्षर काढण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. खाडाखोड करणे, गिचमिड करणे यांसारख्या प्रकाराने आपल्याबद्दलचे मत प्रतिकूल होऊ शकते.


शब्दमर्यादा पाळा :

प्रश्नपत्रिकेत आपल्याला ज्या शब्दमर्यादेत उत्तर लिहिण्यास सांगितले आहे ती शब्दमर्यादा परीक्षार्थीनी पाळल्यास चांगले गुण मिळण्याची शाश्वती निर्माण होते. संदर्भासहित स्पष्टीकरण द्या, यासारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना ती विस्तारानेच लिहिली पाहिजेत. प्रश्न विचारण्यामागचा मुख्य उद्देश उत्तरातून स्पष्ट होणे आवश्यक असते. प्रश्नपत्रिका तपासणारी व्यक्ती किती नेमकेपणाने उत्तर लिहिले आहे, याकडे बारकाईने लक्ष ठेवून असते. जर तुम्ही मूळ उत्तराऐवजी फापटपसाराच लिहिला आणि त्याद्वारे उत्तरपत्रिकेची जागा व्यापून टाकली तर तुम्हाला चांगले गुण मिळणे अवघड होते.

**निबंध लिहिताना :**
निबंधासारख्या प्रश्नाची उत्तरे विशिष्ट शब्दमर्यादेत लिहिणे अपेक्षित असते. अशा वेळी आपण आपला मुद्दा नेमकेपणे किती शब्दात मांडतो याला महत्त्व असते. निबंधासारख्या प्रश्नात अधिक गुण मिळत नाहीत, असे सांगितले जाते. मात्र, आपण निबंध लिहिण्याची तयारी व्यवस्थित केली असेल तर या प्रश्नातही आपल्याला चांगले गुण मिळू शकतात. निबंध लिहिताना तुम्ही म्हणी, वाक्प्रचार यांचा आधार घेतल्यास ते उपयुक्त ठरते. उत्तरे प्रश्नांच्या क्रमानुसारच लिहा : ज्या क्रमाने प्रश्न विचारले आहेत, त्या क्रमानेच प्रश्नांची उत्तरे लिहिली तर उत्तरपत्रिका तपासणे सोपे जाते. आपण त्यादृष्टीने उत्तरपत्रिका लिहिण्याचा सराव करायला हवा. तुम्हाला शेवटच्या प्रश्नाचे उत्तर लिहिता येत असेल तर ते उत्तर आधी लिहून काढा. मात्र, उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पानावरच शेवटच्या प्रश्नाचे उत्तर असले तर ते सोईचे ठरते. मधली पाने उर्वरित प्रश्नांसाठी राखीव ठेवा. क्रमानुसार उत्तरे लिहिणे चालू करा. एखाद्या प्रश्नाचे उत्तर आठवत नसेल तर त्यासाठीची जागा रिकामी ठेवा आणि जेव्हा त्या प्रश्नाचे उत्तर आठवेल त्यावेळी ते लिहा.

**नेमकेपणाने उत्तरे लिहा :** प्रश्नाचे उत्तर ज्या पद्धतीने अपेक्षित आहे, त्याच पद्धतीने ते लिहिले गेले पाहिजे. प्रश्नासंदर्भातील उत्तर सोडून अन्य माहिती तुम्ही उत्तर म्हणून लिहिली तर त्यात तुम्हाला चांगले गुण मिळण्याची शक्यता कमी होते.

व्याकरणाकडे लक्ष द्याः भाषा विषयांची प्रश्नपत्रिका सोडविताना आपण आपले व्याकरण शुद्ध असेल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भाषेच्या उत्तरपत्रिका लिहिताना व्याकरणात्मक चुका तसेच अशुद्ध लिहिणे टाळले पाहिजे. जर अशुद्ध लिहिली किंवा तुमच्या स्पेलिंगमध्ये चुका असतील तर गुण आपोआप कमी होतील हेही लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी आपले व्याकरण चांगले असले पाहिजे व शब्दांची स्पेलिंग अचूक असली पाहिजेत. उत्तरपत्रिका लिहिताना घाईत शब्दांच्या वाक्यांच्या व्याकरणात चुका होणे शक्य असते. अशा वेळी उत्तरे लिहितानाच ती व्याकरणदृष्ट्या अचूक आहेत, त्यातील स्पेलिंग चुकीची नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. अशा बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष ठेवले तर आपल्याला चांगले गुण मिळवणे अवघड जाणार नाही.



**घड्याळाकडे नजर ठेवा :**

आपल्याला उत्तरपत्रिका किती वेळात लिहून संपवायची आहे, याचे भान असणे आवश्यक आहे. त्याकरिता घड्याळावर नजर ठेवत उत्तरपत्रिका लिहिली पाहिजे. जर घड्याळाकडे नजर नसेल तर आपण काही प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी वेळच ठेवू शकत नाही. म्हणजे, काही प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहिण्याच्या नादात आपला निर्धारित वेळ संपत आला आहे, याची जाणीव आपल्याला राहात नाही. ती जाणीव न राहिल्याने आपले काही प्रश्न सोडवायचेच राहतात. तसे झाले तर आपल्याला कमी गुण मिळणार हे उघडच असते. जर तुम्ही १०० पैकी ८० गुणांच्या प्रश्नांची उत्तरे लिहिली असतील तर तुम्हाला त्याचप्रमाणात गुण मिळणार हे लक्षात ठेवा. म्हणूनचघड्याळाकडे नजर ठेवून उत्तरे लिहा. तसे केले तरच आपण सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेत लिहू शकू.

**प्रा. पोपट नाईकनवरे**





# SANGMESHWARIANS ON TREK



**Sangameshwar college** being leading in Solapur city, apart from education, it provides ample facilities to the students.Contribution by each and everyone makes it possible to achieve victory in various fields. It may be academics, sports, cultural activities, NSS ,NCC, etc. Also there are various cells and clubs in our college and one from them is the "Sangameshwar Trekking Club". It is initiated by Dr.Prof.Shivaji Maske (Geography department) in 2020.. The motive of this club is to keep the health of stakeholders intact, as well as explore the glorious forts of our state.Till now we have completed trekking Vasota, Ratangarh & Tikona fort and this time it was Visapur, Lohagarh, Bhaje caves, Karla Caves & Ekvira temple on the list!

It was 10th Feb that we got the notice for this trek and within no time all enthusiastic trekkers grabbed their seats and the ball started rolling. We got proper preparatory instructions and following the same we hit the road by 9:30 p.m. on 18th Feb, 2023. On 19th Feb it was Sunday and birth anniversary of Chhatrapati Shivaji Maharaj, so it was best of both the world's for the trek.

On 19th, we reached the Bhaje village around 5:30 a.m. After freshning and winding up our breakfast , by 7:00 a.m. we headed towards the trek. The start was in ghat region; a walk of 4 km, split the road into two. The trail on the right was Lohagarh, and towards the left was Visapur fort.First, we embarked for Visapur fort (Ht.3556 ft). It was a rocky trek that we completed in an hour. On the top we saw Mahadev and Hanuman temple along with isolated caves, old house ruins, ancient water cisterns & huge flour mill. It had beautiful view and foggy clouds to capture pictures and store it as a memory.It was an unforgettable adventurous trek for all.

## SANGMESHWARIANS ON TREK




After reverting from Visapur fort , we had typical Maharashtrian lunch in the lap of nature. The cool water of Pawna dam was saviour for we people. Then energized people joined for Lohagarh trek, which is situated on the same plateau and is twin fort to Visapur. Comprising of 2500 steps we completed it by 1:00 p.m. with company of my friends and monkeys in the surrounding. At the top, was scorching sun along with cool breeze. It was a breathtaking view that are souls witnessed right there. We met a troop alike us who were there to clean the fort on occasion of Shivaji Maharaj's birth anniversary. The fort being rich in heritage, there we saw Shivkalin Canon,Lakshmi Kothi, Vinchu Kada,Darga,wells,cave,Ganesh and Hanuman door. Following the same route we returned by 3:30 p.m.

The slogans of Shivaji Maharaj chanted at the top had spread positive vibrations everywhere! For both the fort there were arrows all along the way, steering the trekkers in the right direction which we followed cautiously. These majestic forts offer a panoramic view of lakes ,clouds and other forts making the view even more mesmerizing.

"Fortune favours the bold" and so now it was time to head towards the Bhaje village to hike the "Bhaje Caves". It had 300 steps which felt like 3000 for us after the two treks. It's one of the ancient Buddhist caves with fine carvings.

A splash of water on our face , energized us and by 4:30 p.m. we left for Karla caves and Ekvira temple. To reach the temple top we ascended almost 500 steps. All slouching yet thespiritual vibrations helped us reach there. There was a board written;



स्वच्छता असेल जिथे, लक्ष्मी नांदेल तिथे

But unfortunately , stupid humans didn't leave this place also to clutter. The sunset view above was captivating and the valley below was polluted with plastic. It was a holistic and horriblefeeling at the same time. Due to time constraint we missed the Karla Caves but saw facade beside the temple. On the way back, along with memories,shopped some sweets. Then tired we had our dinner and we hit the sack in our respective seats. Around 4:30 a.m. the next day we reverted to the college.

With the company of Maske sir, Khandekar sir,Kharade sir,Rajguru sir, Solapure sir, Jadhav sir, Vhangavde sir, staff- Santosh Fulari , Vinayak Sarangmath, Dhananjay Bachhav. Friends including Rutuja Lakshmi ,Shweta, Priyanka ,Komal , Payal, Arpita, Gayatri ,Labdhee, Vaishnavi, Nikhil, Prithviraj, Onkar ,Aditya, Anurag,Vedant,Nandan Aniket, Sagar,Rishikesh,Shravan ,Mahesh,Ruturaj,Kunal, Sanket, Samarth,Manoj ,Aakash & Anuj ; all proved to be fit us fiddle and completed this wonderful trek.

Summing up, heartfelt thanks to the organisers for assuring care free trek. It has surely given us lesson for maintaining fitness and importance of visiting historical forts on special occasions like 19th Feb. It was a fantastic initiative ;

For some it was too much,
For some it was too little;
The top we could touch ,
Was possible with help of friends giggle ! !

**MITALI VENKATESH CHOUBE**

B.A III ( English Department )



## संगमेश्वरच्या ट्रेकर्सनी सर केला लोहगड

# ट्रेकिंग क्लबच्यावतीने लोहगड- विसापूर किल्ल्यावर ट्रेकिंगचे आयोजन



सोलापूर, दि. २७- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व व भौगोलिक स्थिती यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संगमेश्वर कॉलेजमधील ट्रेकिंग क्लबच्यावतीने लोहगड- विसापूर किल्ल्यावर ट्रेकिंगचे आयोजन करण्यात आले होते.

या ट्रेकिंगमध्ये ९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या दोन्ही किल्ल्यांचा इतिहास निंबाळकर या गाईडने विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. सर्वांनी किल्ल्यांचा इतिहास जाणून चिऊन छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष करीत लोहगड विसापूर किल्ल्यावर शिवजयंती हात आजरी केली. पर्यावरणाचे संवर्धन करीत सर्व ट्रेकर ३४०० फूट उंच लोहगड किल्ल्यावर पोहोचले. किल्ल्यावरील महादेवाचे दर्शन घेऊन सर्वांनी निसर्गाचा मनमुराद आनंद लुटला. लोहगड किल्ल्यांवरील शिवकालीन तोफा, लक्ष्मी कोठी, विंचू कडा, दर्गा, सोळा कोणी विहीर, गुहा, महादरवाजा, गणेश दरवाजा, हनुमान दरवाजा आदी ठिकाणे पाहून सर्व ट्रेकरनी एकमेकांना हात देत सुखरूप खाली उतरले. लोहगडाच्या जवळच त्यानंतर लोहगडाच्या जवळच असलेला ३५५६ फूट उंच विसापूर किल्ल्यावर चढाई केली. त्यानंतर भाजे व कार्ले या प्राचीन बौद्ध लेण्यांना भेट देऊन लेण्यांची माहिती घेतली. क्लबचे समन्वयक डॉ. शिवाजी मस्के यांच्या नेतृत्वाखाली डॉ. दादासाहेब खांडेकर, डॉ. प्रवीण राजगुरू, प्रा. नागराज खराडे, प्रा. शिरीष जाधव, प्रा. युवराज सोलापुरे, भारत व्हनगावडे, संतोष फुलारी, विनायक सारंगमठ, धनंजय बच्चाव यांच्यासह विद्यार्थ्यांनी हा ट्रेक उत्साहात पूर्ण केला.

# पालकांचे आचरण हे मुलांसाठी अनुकरणीय असते - डॉ.गुरुराज करजगी

# 'पालकत्व एक कला' या विषयावर व्याख्यान



**सोलापूर ( दिनांक २७ )** '' पालक हे मुलांचे आदर्श असतात त्यामुळे पालकांचे आचरण हे मुलांसाठी अनुकरणीय असते. असे प्रतिपादन ॲकॅडमी फोर क्रिएटिव्ह टीचिंग बंगळूरूचे चेअरमन डॉ. गुरुराज करजगी यांनी केलं. सोमवारी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अप्पासाहेब काडादी प्रबोधन मंच यांच्यावतीने संगमेश्वर महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ.गुरुराज करजगी यांचे ' पालकत्व एक कला ' या विषयावर व्याख्यान झाले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी अप्पासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी यांनी शिक्षणाची गरज ओळखून कर्मयोगी अप्पासाहेबांनी शैक्षणिक संस्था उभारल्या स्वतःच्या कृतीद्वारे मुलांना शिस्तीचे स्वावलंबनाचे धडे दिले. असे सांगून सोलापुरातील पालकांशी हितगुज साधण्यासाठी या व्याख्यानाचे आयोजन केले असल्याचं त्यांनी सांगितलं.

आपल्या व्याख्यानात डॉ. करजगी यांनी अति काळजी करणारा पालक वर्ग, निष्काळजी पालक वर्ग, आणि कडक शिस्तीचा पालक वर्ग या तीन मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. ते म्हणाले काही पालक न मागता अनेक सुखवस्तू देतात, पण वस्तूंचे मूल्य न कळाल्याने नातेसंबंधाचे महत्त्व ही मुले विसरतात. सुजाण पालक होण्यासाठी मुलांचे बोलणे लक्षपूर्वक ऐका. मुलांच्या भावना व्यवस्थितपणे हाताळा.त्यांच्यासाठी कुटुंबासाठी वेळ काढा. आपल्या बालपणीचे प्रसंग त्यांना सांगून बोलते करा. मुलांसमोर नकारात्मक न बोलता त्यांना चांगल्या कामासाठी प्रेरणा द्या. दुसऱ्या मुलांची आपल्या मुलांशी तुलना न करता त्यांना पाठिंबा द्या. अशा टिप्स त्यांनी उपस्थित पालकांना दिल्या.

व्याख्यानानंतर पालकांना पालकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसनही डॉक्टर करजगी यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य राजेंद्र देसाई यांनी केले. पाहुण्यांचे परिचय शुभांगी गावंडे यांनी करून दिला सूत्रसंचालन पुष्पांजली मैत्री आणि संतोष पवार यांनी केले. कार्यक्रमास प्रा.केशव शिंदे, माजी प्राचार्य नरेश बदनोरे विधिदनी रा. गो. मेत्रस, पुष्पराज काडादी, ज्योती काडादी, शितल काडादी, तेजश्री काडादी, विश्वनाथ ब्ऱ्हाणपुरे, गंगाधर कुमठेकर, भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, ॲडव्होकेट आर. एस. पाटील, प्रा.डॉ. राजशेखर येळीकर, मल्लिकार्जुन कळके, सी.बी. नाडगौडा ,यांच्यासह सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुल, संगमेश्वर शिक्षण संकुल, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना शिक्षण संकुलातील मुख्याध्यापक , शिक्षक , पालक आदी उपस्थित होते.

# संगमेश्वर कॉलेजमध्ये वाय- 20 अंतर्गत स्पर्धांचे आयोजन

## भारत सरकारच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाचा उपक्रम

**सोलापूर:** जी-20 ही जगातील प्रमुख देशांची सर्वोच्च संस्था आहे. प्रत्येक वर्षी एक वेगळ देश याचे यजमानपद भूषवितो. 2023 मध्ये भारत देशाला हे यजमानपद मिळालेले आहे. ही अभिमानाची गोष्ट् आहे. जी-20 संघटनेच्या वतीने होणाऱ्या या कार्यक्रमात देशातील नागरिक व युवकांचा सहभाग असावा. या धर्तीवर भारत सरकारच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने युथ म्हणजे वाय-20 या उपक्रमाची सुरुवात करण्यात आलेली आहे. या उपक्रमांतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यासाठी महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयातील एकएक कॉलेजची निवड करण्यात आलेली असून सोलापूर जिल्हयातून संगमेश्वर कॉलेजला हा मान मिळालेला आहे.

या उपक्रमांतर्गत दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी सकाळी १० वाजता संगमेश्वर कॉलेजमध्ये वक्तृत्व्, निबंधलेखन, गटचर्चा आणि पोस्ट्र प्रेझेन्टेशन इत्यादी स्पर्धा होणार आहेत. या समारंभाचे उद्धाटन महाराष्ट्र शासनाच्या उच्च् शिक्षण सोलापूर विभागाचे सह संचालक डॉ. उमेश काकडे, जिल्हा माहिती अधिकारी मा. संपूदा बिडकर, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी मा. अजित कुमार यांच्या प्रमुख उपस्थित होईल. या स्पर्धांमध्ये वक्तृत्व् स्पर्धेसाठी शेअर सामाईक भविष्य् : लोकशाही आणि शासनात युवकांचा सहभाग आणि भविष्यातील कामकाज उद्योग ४ .0 नविनता आणि २१ व्या शतकाचे कौशल्य् हे विषय असून याचे समन्व्यक म्हणून डॉ. ऋतूराज बुवा आणि डॉ. वंदना पुरोहित हे काम पाहणार आहेत. निबंधलेखनासाठी शांतता निर्माण आणि समेट : युध्द् रहित नवीन युगात प्रवेश हा विषय देण्यात आलेला असून याचे समन्वयक म्हणून डॉ. एस.एस. गावंडे या काम पाहणार आहेत. गटचर्चेत स्वास्थ्य कल्याण आणि खेळ युवकांसाठी आराखडाहा विषय असून याचे समन्वयक प्रा. आनंद चव्हाण आहेत. पोस्ट्र प्रेझेन्टेशन साठी हवामान बदल आणि आपत्ती धोका कपातः टिकाऊपणे जगण्याचे मार्ग हे विषयसूत्र देण्यात आलेले आहे. याचे समन्व्यक डॉ. शिवाजी मस्के करणार आहेत. या स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना दिनांक ११ मार्च २०२३ रोजी सिम्बॉयोसिस विद्यापीठ पुणे येथे होणाऱ्या अंतिम स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये होणाऱ्या सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन वाय- २० हा उपक्रम यशस्वी करावा. अधिक माहितीसाठी नुडल आफिसर प्रा.अर्जुन चौधरी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र् देसाई यांनी केले आहे.

# तरुणांच्या कल्पक संशोधनाला वाय ट्वेंटी तून संधी - डॉ. उमेश काकडे

## संगमेश्वरमध्ये युथ ट्वेंटीच्या स्पर्धा उत्साहात संपन्न




सोलापूर( दिनांक 2 मार्च प्रतिनिधी) ' जी 20 देशांप्रमाणेच प्रगत देशातील तरुणांसोबत विचार मंथनासाठी तसेच जागतिक स्तरावरील कल्पक संशोधनात भारतीय तरुणांना संधी मिळणार आहे, महाविद्यालयीन आणि विद्यापीठ शिक्षणाच्या व्यासपीठातून स्टार्टअपपासून - हवामान बदलापर्यंतच्या विविध क्षेत्रात कार्यरत तरुणांना एकत्र येण्यासाठी युथ ट्वेंटी या कार्यक्रमांची आखणी भारतभर केंद्र शासन करत आहे. या संधीचा उपयोग विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील तरुणांनी घ्यावा.'' असे आवाहन डॉ. उमेश काकडे (शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण सोलापूर विभाग ) यांनी केलं. ते संगमेश्वर कॉलेज स्वायत्त इथे आयोजित केलेल्या येथे 'युथ ट्वेंटी सोलापूर समिट' या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक अजित कुमार, सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य प्राध्यापिका ज्योती काडादी,प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई, समन्वयक प्रा,अर्जुन चौधरी यांची उपस्थिती होती.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत झाले. त्यानंतर दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई यांनी' वाय ट्वेंटी सोलापूर समिट'चे प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांचा सत्कार कॉलेजच्या वतीने झाले. उद्घाटन प्रसंगी बोलताना काकडे पुढे म्हणाले की,'' युवा महोत्सवासारखेच याचे स्वरूप असून यात विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवावा.'' नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक अजित कुमार यांनी आपल्या मनोगतात क्रीडा व युवक कल्याण संचालनालय केंद्र शासन यांच्यामार्फत हा उपक्रम महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला आहे असे सांगितले.

# संगमेश्वरमध्ये युथ ट्वेंटीच्या स्पर्धा उत्साहात संपन्न...



तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.ऋतुराज बुवा (राज्यशास्त्र विभागप्रमुख) यांनी 'जी ट्वेंटी ते वाय ट्वेंटी' यामधील सद्यस्थितीतील स्थित्यंतराचा आढावा घेत उपस्थित सर्वांना पीपीटी सादरीकरणासह सविस्तर विवेचन केले. 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना घेऊन 'जी २०' मध्ये आपला देश सहभागी आहे. या संकल्पनेतील कार्यक्रमात जागतिक स्तरावरील विविध क्षेत्रातील संधी आणि समस्या यात तरुणाईला कशी संधीचे उपल निर्माण झाली आहे. आपल्या देशाचा विकसनशीलतेतून प्रगत राष्ट्राकडे प्रवास होण्यासाठी या परिषदांमधून प्रगत राष्ट्रातील युवा नेतृत्वाचे अनुभव कथन आपल्याला ऐकायला मिळणार आहे. ग्लोबल युथ लीडरशिप साठीचा समन्वय या परिषदेतून नक्की साधला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी यांनी राष्ट्रीय स्तरावरील या अनोख्या उपक्रमात राज्यातील जिल्हास्तरावरील यजमानपद संगमेश्वर कॉलेजला दिल्याबद्दल ऋण व्यक्त केले. या उपक्रमात वक्तृत्व, पोस्टर प्रेसेंटेशन, गटचर्चा या उपक्रमशील उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. मार्गदर्शकांनी महाविद्यालयीन स्तरावरील सुविधांचा वापर करून तरुणांना प्रोत्साहित करावे. असे आवाहन केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डी. एम. मेत्री यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा.डॉ.पुष्पांजली मेत्री आणि प्रा. संतोष पवार यांनी केले. तर आभार श्रेया माशाळ या विद्यार्थिनीने मानले .

# संगमेश्वरमध्ये युथ ट्वेंटीच्या स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या . त्या प्रसंगाची क्षणचित्रे





